**<u>सं. फौ. खटला क्र.११६/२०१७</u>**
**<u>निशाणी क्र. (७८)</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::</u>**
**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : ग्यानोबा साधुराम माने,

**<u>वय</u>** : ५० वर्षे, **<u>धंदा</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : कोणाळी, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

०१. दि.२१/०१/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता कोणाळी येथे डी.पी. जवळ घटना घडली. आरोपी प्रतापने गाडीने माझ्या वडिलांना धडक दिली होती. त्यामुळे माझ्या वडिलांचा डावा हात व पाय मोडला होता. आम्ही माझ्या वडिलांना ॲटोद्वारे उदगीर येथील दवाखान्यामध्ये नेले. सदर दवाखान्यामध्ये माझ्या वडिलांची शस्त्रक्रिया झाली. आरोपी प्रताप न्यायालयामध्ये हजर आहेत. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपी तर्फे उलटतपासणी वकील श्री. एस.एम. बिराजदार यांचेमार्फत ::</u>**

०२. मी अपघात प्रत्यक्ष बघितलेला नाही. माझा भाऊ दशरथ व नामदेव यांनी मला फोन करून अपघात स्थळी बोलावले होते. मी त्याप्रमाणे तेथे गेलो होतो. त्यावेळी तेथे दशरथ, नामदेव, वडील साधुराम, सुकुमारबाई, रामेश्वर व लक्ष्मीकांत हे होते. परंतु ईतर कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या वडिलांना गाडीने धडक दिल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि. ०३/०७/२०२५.